# मुलांची मुल्यांशी फारकत

आज अचानक मुलांची एक नविनच व्याख्या मला गवसली. मुले हा शब्द मुल्ये या वरुन तयार झाला असावा. ज्यांच्याजवळ मुल्ये ती मुले. पण नंतर मीच दचकले ! अहो आज तर मुलांजवळ मुल्ये दिसतच नाही. मग माझी व्याख्या चुकली का ? असं का झालं ?

मुल्ये खोलवर रुजायला पालक, शाळा, समाज, वातावरण यांचा फार मोठा वाटा असतो. आज मुलांना मुल्ये पायदळी तुडवतांना थोडीशी सुध्दा भीड, भीती, चाड वाटत नाही. किंबहुना आज समाज त्यांच्याकडून मुल्यांची मागणीही करत नाही. का? आज समाजातून सुध्दा मुल्यांचा ऱ्हास झालेला दिसतो. मग फक्त मुल्ये मुलांनीच का धारण करायची ? मुले पोलीस ठाण्यात Lock up मध्ये बंद झालीत तर पालक बिनबोभाट त्यांना सोडवून आणतात. हे झालं एक टोक, पण साधी सोपी छोटी छोटी मुल्ये तीचा सुध्दा अभावच दिसतो. मुले आवाज चढवून मोठ्यांशी, खुद्द पालकांशी, शिक्षकांशी कशी बोलू शकतात ? खोटं बोलणं, छोट्या मोठ्या चोऱ्यांसारख्या हरकती करणं, साधं मोठ्या माणसांशी उभं राहून बोलणं, ही मुल्ये आज दिसत नाही.

वाहतुकीचे संकेत मोडतांना, रस्त्यावर आरडा-ओरड करतांना, मुलांना त्यांचच मन रोकत कस नाही ? काय करतय आजच शिक्षण ? मुल्य शिक्षणावर भारंभार पुस्तके गेल्या १५ वर्षांपासून दिसतात, मग अपयश का? आज मुले मोठ्या माणसांशी उठसूठ वाद घालतात, मोठ्यांच ऐकणं व ऐकून घेणं याला काहीच कस महत्व नाही ? नम्रता हा अवगुण का ठरतो ?

आत्ताशी तर फक्त छोट्या मोठ्या वागणूकींच्या नियमांवर बोट ठेवलंय, मग याच थोड्याश्या मोठ्या, महाविद्यालयीन तरुणांकडे मी चारित्र्याची मागणी कशी करु ? शाळा, महाविद्यालयांकडे ज्ञानाची देवालये म्हणून बघितल होतं, तर मुलांनी तिथेही पाठ फिरवली आणि त्यांनी निवडले ते घोकंमपट्टी करवून घेणारे, मार्कांसाठी असंख्य क्लुप्त्यांचा अवलंब करणारे ट्यूशन्स.

मुले आज हिंसक बनली आहेत. वर्गात एकदम दुसऱ्याचा अंगावर धावून

जाणे, मारणे तर सहज स्वभाव बनलाय मुलांचा. आपण यांच्याकडून सयंम, नम्रपणाची अपेक्षा नाही का ठेऊ शकणार ?

आज भाषेच्या अभावाने पण हिंसकता जोपासली आहे. मुलांजवळ उत्तम भाषा असली तर ते मृदूता जोपासून शांतपणे आपली बाजू मांडू शकतील, हिंसकतेला छेद दिला जाऊ शकेल. पण भाषांना आज शिक्षणात स्थानच दिसत नाही. मुलांना व्यक्त होण्यासाठी समृध्द भाषांचा खूप मोठा सहभाग असतो. पण भाषेचा अभाव त्यांना हिंसक बनवण्यास भाग पाडतो.

आज विद्यार्थी दिवसभर गॅजेटस् हाताळतात. मिळून मिसळून राहणे, समाजाचे काही नियम, मर्यादा आहेत, त्या पाळणे हे लहानपणीच रुजणे महत्वाचे आहे. थोडं झुकणं, दुसऱ्यांना मान देणं, वाद घालण्यापासून स्वतःला रोकणं, मोठ्या माणसांना बसायला जागा देणं ही सुध्दा मुल्येच ; पण दुर्मिळ झालेली. स्वार्थ तर अगदी ठासून भरलेला दिसतो पण स्वार्थात प्रत्येक वेळी थोडासा परमार्थ हवाच, हे ही शिकवण गरजेच झाल आहे.

मुल्यांविरहित मुलांना मुले म्हणताच येणार नाही. मुल्ये रुजवणे, नंतर त्यांची जोपासना करणे आणि सुख, समाधान व शांती मिळवणे सहज शक्य होईल, पण मुलांना मुल्यांच महत्त्व समजलं तरच हे साध्य होईल.

नासधूस, विध्वंस, विस्कळीत व्यक्तिमत्त्व हाच आज विद्यार्थ्यांचा स्वभाव बनत जातो पण जर त्यांना या गोष्टींपासून अत्यंत हळूवारपणे, प्रेमाने परावृत्त करण्यासाठी ध्यानासारख्या सकारात्मक उपाय योजनांचा अवलंब केल्यास उत्साह वाढेल व प्रेम, आत्मीयता, ओलावा हे गुण डोकवायला सुरुवात होईल. पण आज पालक बघतात ते CBSE, English Medium सारख्या गोष्टी. पण मुल्यांची मागणीच करत नाहीत. तेव्हा शिक्षणातून जर या गोष्टी मिळाल्या नाहीत तर फक्त पुस्तकी शिक्षण मिळेल ते किती दिवस पुरेल हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो.

प्रामाणिकता, निष्ठा, पावित्र्य हाच आहे व्यक्तीमत्वाचा मुलभूत पाया, पण ढासळलेला. तेव्हा भरभक्कम पायावरच होईल मुल्यांची रुजवात आणि मगच

घडेल समृध्द, प्रगल्भ आणि चारित्र्यसंपन्न असा समाज. मग प्रत्येक मुलांमध्ये दिसेल मुल्यांची उधळण आणि तिथेच संपेल भेद मुलाचा आणि मुल्यांचा.